भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ८३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/१२/२०१७

१) देशी दारू दुकानातील दारूनी भरलेले पेटयांची चोरी . :—

दिनांक २८/१२/२०१६ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने रात्र दरम्यान देशी दारू दुकानाचे ताला व दरवाजा तोडुन १) देशी दारू सुप्रिम ९० एमएल नी भरलेल्या १९ पेटया कि. ४०,४००/रु. २) सि.डी. संत्रा देशी दारू ९० एमएलनी भरलेल्या ४ पेटया कि. ८,५२०/रु. ३) सि. डी. संत्रा देशी दारू १८० एमएलनी भरलेली १ पेटी कि. २,१००/रु. असा एकुन कि. ५१,०९०/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी सुधाकर भुषन बोरकर वय ४४ वर्ष रा. कोंढा यांची तोंडी रिपोर्ट वरून व मा. पिएसओ.सा. यांचे आदेशान्वये पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३८०,४६१ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

२) अंधारात अपले अस्थीत्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक २९/१२/२०१७ चे ०१.४५ वाजता दरम्यान यातील हा आपले अस्तित्व लपवुन अंधाराचा फायदा घेत मालाविषयी गुन्हा करण्याचे उददेशाने संशयीत रित्या मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. कांबळे यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १२२ महा.पो. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

३) शासकीय जमिनीवर बांध्या तयार करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. . :—

दिनांक २९/१२/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने पिंपळगावातील पाटबंधारे विभागाचा तलाव गट क्र. ३०५ आराजी ८९.१२ हेक्टर अंदाजे २० एकर शासकीय जमिनीवर बांध्या तयार केले त्यास असे करण्यास मनाई केले असता, साक्षीदार मुरली धर ढेंगे याला जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी कु.प्रणाली अरविंदराव कुनवटकर वय ३२ वर्ष उपविभागीय अभियंता पाठबंधारे विभाग भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४४७,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

४) वाहनाच्या धडकेत दोन जखमी . . :—

दिनांक २९/१२/२०१७ चे १६.३० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी हा त्याचे पत्नी सौ. प्रतिमा मडावी वय ३८ वर्ष रा. हिचेसह मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ३८४७ ने एनएच ०६ रोडने भंडारा कडुन खुटसावरी फाटयावरून वळत असतांनी भंडारा रोड कडुन लाखनी कडे एनएच ०६ रोड कडुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी जखमीचे मोटार सायकलला मागेहुन धडक मारून फिर्यादी व त्याचे पत्नीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी प्रकाश रघुनाथ मडावी वय ४७ वर्ष रा. दईतमांगली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. ईडपाते पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

५) **निष्काळजीपणे ट्रक चालवुन पोलला धडक देवुन तार तुटुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद. . :–**

दिनांक २९/१२/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्यांचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन चांदोरी गावातील म.रा.वि.वि. कंपनीचे ३ पोल ला धडक देवुन वाकवील्याने व तार तुटले, त्यामुळे एमएसईबी विभागाचे ४०,०००/रु. चे नुकसान केले तसेच गावकरी लोकांचे नुकसान झाल्याने, असे फिर्यादी दिनेश पतीराम ढवळे वय ३४ वर्ष रा. धारगाव वरिष्ठ तंत्रज्ञ चांदोरी म.रा.वि.वि.कं. यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भादवी. सहकलम १८४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) **गौवंश प्राणी कापुन त्याचे मास आपले आर्थीक फायदया करीता विक्री करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. . :–**

दिनांक २९/१२/२०१७ चे १२.५० यातील आरोपी आरोपी हा त्याचे घरी गौवंश प्राणी कापुन त्याचे मास कोणतीही कायदेशीर परवानगी नसतांना स्वत:चे ताब्यात बाळगुण आपले आर्थीक फायदया करीता विक्री करतांनी मिळुन आला त्याचे पासुन गौमास ७ किलो ८०० ग्रॅम, वजन काटा, लोखंडी काता असा एकुन ११००/रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. थेर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

७) **खात्यामधुन डेबीड कार्ड द्वारे ऑन लाईन व्यव्हार केल्याने गुन्हा नोंद. . :–**

दिनांक २९/१२/२०१७ चे १४.२१ वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे परवानगी शिवाय तिचे भारतीय स्टेट बॅकेचा खात्यामधुन डेबीड कार्ड द्वारे एकुन १४,२००/रु. चा ऑन लाईनवर व्यव्हार केल्याने फिर्यादी स्नेहा विलास मुरकुटे वय ३० वर्ष रा. शास्त्री नगर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. सहकलम ६६(क)(ड) माहीती तंत्रज्ञान अधी. २०० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

८) **अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/१२/२०१७ चे १२.०९ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आपले मोठया भावाचे राईसमिल जवळ उभा असतांना पवनीचे तहसीलदार काकडे यांनी राईसमिलचे बाजुला असलेल्या धर्म काटयावर ओव्हरलोड ट्रक एमएच ४० एके ४३२५ चे वजन केले असता, ४ टन ओव्हरलोड असल्याचे निश्चीत झाल्याने यातील आरोपी याला वाटले की, युनियनच्या लोकांनी माझा ओव्हरलोड ट्रक पकडुन दिला असावा म्हणुन ट्रक मालक आरोपी याने फिर्यादी व युनियनच्या लोकांना विदर्भ लोकल ट्रक युनियन १ या वॉट्सअप ग्रुपवर व्हाईस कॉल करून अश्लिल शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिले असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

८)दारू पिवुन दारूच्य नशेत वाहनचालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २९/१२/२०१७ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचा ताब्यातील मोटार सायकल हि दारू पिवुन दारूच्या नशेत गांधी चौक पवनी येथे आमरोडवर चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे वैदयकीय परीक्षण अहवाला वरून तसेच सर तर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा नोंद पुढील तपास पोना रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

९) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :—

दिनांक २९/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर,कारधा सिहोरा व पवनी येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५७ लटर हातभट्टी दारू किंमती ४,९००/—रु. व- ०२ लिटर ८८० मिलीलीटर देशी दारू कि.८५०/रु. असा एकुन ५,७५०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २९/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ४४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती— ०८ केसेस व ईतर वाहनांवरती —३६ केसेस करण्यात आलेले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.